**<u>आरोपी तर्फे उलटतपास ॲड. डी.एम.बर्गे यांचेकडुन</u>**

हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ हे माझे चुलते व चुलती आहेत. आरोपी क्र.२ व माझी सासु चुलत भाउ बहिण आहेत. माझे सासुचे वडील परागंदा होते. त्यामुळे माझे आजोबा माझे सासुची एकत्र कुटुंबाची जमिन वहिवाटत होते. माझे आजोबा अगर माझे वडीलांनी माझे सासुला जमिनींचे वाटप करुन दिले नव्हते व नाही याबाबत मला माहिती नाही.

माझे लग्न होवून २१ वर्षे झाली. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्नापासून वाटपा संदर्भात आरोपी व माझे सासरचे कुटुंबामध्ये वाद आहेत. कुमठे येथील सर्व जमिनींना माझे सासुचे नाव आहे मात्र सर्व जमिनीमध्ये आमची वहिवाट नाही.

हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ मध्ये गट क्र.८१२ चा १० चे संपुर्ण क्षेत्रात आरोपींनी ज्वारीचे पिक केले होते. हे म्हणणे खरे नाही की, या पिकास आरोपींनी पाणी दिले होते, मशागत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनीच सर्व ज्वारीचे पिक काढुन टाकले होते. आरोपींनीच ज्वारीचे कणसांची खुडणी केली होती. सदर ज्वारी पिकाचे उत्पन्न आरोपींनीच घेतले. आरोपींनी या जमिनीतील ज्वारी पिकाची चोरी केली म्हणून माझे पतीने आरोपीं विरुध्द पोलिसांकडे तक्रार केली नव्हती. आम्ही नुकसान भरपाईसाठी दावा केला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी ज्वारीचे पिक उपटले असे आम्हाला कांतीलाल जगदाळे यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८/०३/२०१५ रोजी मी, माझे पती व सासु ज्वारीची कणसे खुडणेसाठी आर्टीकल अ व ब ला असलेले विळे घेवून या शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासुचा स्वभाव रागीट आहे, त्या चिडतात, शिव्या देतात. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही शेतात गेलो त्यावेळी आरोपींनी कणसे खुडणेसाठी मजुर महिला लावल्या होत्या व कणसे खुडायचे काम चालु होते. आम्ही शेतात दुपारी तीन वाजता गेलो होतो त्यावेळी निम्म्याहुन कमी कणसे खुडुण झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गेलो त्यावेळी आरोपी क्र.१ त्या ठिकाणी सुरुवातीला नव्हती, त्यावेळी ती विहरीवर

पाणी आणायला गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही शेतात गेल्यावर माझी सासु व पती आरोपी क्र.१ ला हे आमचे शेत आहे, कणसे खुडायची नाहीत, येथुन निघुन जा असे सांगत होते. परंतु आरोपींनी कणसे खुडायचे काम बंद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी कणसे खुडायचे बंद करेणात म्हणुन आम्ही तिघेही चिडलो, आम्हाला राग आला व त्यावेळी आरोपी व आमचे मध्ये बाचाबाची झाली. तोंडी बाचाबाची व्दारे हा विषय संपला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही आरोपी व त्यांचे मुलीस धक्काबुक्की करु लागलो. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीने आरोपींचे मुलीस लाथ मारुन खाली पाडले व तिचे उजव्या हाताचे मनगटावर विळयाने मारले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी दिप्तीच्या उजव्या हाताचे मनगटाला जखम झाली होती. तिला सरकारी दवाखाना कोरेगांव येथे ॲडमिट केले होते. हे म्हणणे खरे नाही की, तोंडी सांगुन देखील ऐकत नाहीत म्हणून आम्ही आरोपी व त्यांचे मुलीस मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही त्यांना मारहाण केली म्हणून आरोपी क्र.१ ने आमचे विरुध्द दि.११/०३/२०१५ रोजी पोलिस ठाणेत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या तक्रारीवरुन आम्हा तिघांना अटक झाली होती. आमचे विरुध्दची ती केस अजुन चालु आहे.

दि.०८/०३/२०१५ रोजीची घटना अर्धा तास चालु होती. भांडणे चालु होती त्यावेळी मजुर बायका त्या ठिकाणी होत्या. आमची भांडणे कोणीही सोडवली नाही. भांडणामध्ये कणसे, कडबा विस्कटले नव्हते. माझे सासुबाईनी आरोपींना मी कणसे विस्कटुन टाकेण असे म्हटले. हे म्हणणे खरे नाही की, आमचे झटापटीत माझे हातातील विळा माझे पतीस लागला. हे म्हणणे खरे नाही की, सासुला काही लागले नव्हते. मला शिवरीचे काठीने पाठीवर मारले

होते. मला काठीने पाठीवर कोणी मारले हे मी पाहीले नाही. माझे पतीला व सासुला विळयांनी मारले होते. विळा व खुरप वेगळे असते. शिवरीची काठी व डोंगरी झाडाची काठी वेगळे असते. पतीला व सासुला लागले नंतर त्यांचे रक्त कपडयांवर पडले होते. मला पाठीत काठीने मारले असे मी सरकारी दवाखान्यात डॉक्टरांना सांगितले होते. त्याबाबत मला एक इंजेक्शन व गोळया दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, ज्या दिवशी पती व सासुला सरकारी दवाखान्यात नेले त्याच दिवशी त्यांना दवाखान्यातुन सोडले. माझे म्हणणे नुसार ८ मार्च २०१५ पासून चार दिवस माझे पती व सासु दवाखान्यात अॅडमिट होते. या कालावधीत मी या दोघांचे सोबत दवाखान्यातच होते. घटनेनंतर कोरेगांवात आलेवर आम्ही पहिल्यांदा पोलिस स्टेशनला गेलो. पोलिस ठाणेत गेलेवर आम्ही घटनेबाबत तक्रार दिली. घटनेनंतर आम्ही कोरेगावात एका मोटरसायकल वरुन तिघेजण आलो. मोटरसायकल माझे पती चालवत होते. आम्ही दवाखान्यात असताना पोलिस आमचेकडे चौकशी करायला आले नव्हते. दवाखान्यात जाणेपुर्वी पोलिसांनी आमची तक्रार लिहुन घेतली होती. दवाखान्यात जाणेसाठी पोलिसांनी आम्हाला यादी दिली होती. या घटनेचे संदर्भात पोलिसांनी माझेकडे चौकशी केली नाही व माझा जबाब नोंदविला नाही. जप्त मुद्देमाला पैकी एक विळा आहे, एक खुरप आहे. हे म्हणणे खरे नाही की, जप्त काठी शिवरीची नाही डोंगरी काठी आहे. आर्टीकल अ, ब, क ला असलेले हत्यारच किंवा साधनेच भांडणाचे वेळी वापरले गेले होते हे मला निश्चीत सांगता येणार नाही. सदर मुद्देमाल मी पोलिस ठाणेत पाहीला नव्हता.

कणसे खुडायला असणा—या महिला कोण होत्या हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तिघांनी येवून आरोपींचे कणसे काढणेचे

कामात अढथळा आणला व त्यामुळेच भांडणे, बाचाबाची झाली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व दिप्ती आमचे तिघांमुळे जखमी झाले. त्यावेळी दिप्ती अल्पवयीन होती. सातारा येथे बालन्यायमंडळात दिप्ती विरुध्द खटला दाखल झाला होता. तेथे माझी साक्ष झाली होती. त्या खटल्यातून दिप्तीला निर्दोष सोडणेत आले हे मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दि.०८/०३/२०१५ रोजी आरोपी व आमचे मध्ये ज्वारी काढणेचे कारणा वरुन भांडण झाले, मारामारी झाली, संगिताने माझे पतीचे डोक्यात विळा मारला, दिप्तीने सासुचे डोक्यात विळयाने मारले, दिप्तीने सासुचे पाठीत लाकडी दांडक्याने मारले, संगिता व दिप्तीने आम्हा तिघांना धक्काबुक्की केली, पती व सासु चार दिवस दवाखान्यात ॲडमिट होते, त्यांना टाके घातले होते, सदर मुद्रदेमाल आरोपींनी वापरला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपी व त्यांचे मुलीस विळयाने व लाकडी दांडक्याने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमचे विरुध्द पोलिस ठाणेत तक्रार दाखल केलेनंतर पश्चात बुध्दीने आम्ही त्यांचे विरुध्द तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जबाब दिला आहे.

उलटतपास पुर्ण,

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

(जी.एस.माने)

तारीख : ११/०८/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव